# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक :
०२०-२५६०१२०६
२५६०१२१८
२५६०१२०३
फॅक्स : ०२०-२५६९१३४१

परीक्षा विभाग
गणेशखिंड, पुणे ४११ ००७

Website : www.unipune.ac.in
E-mail : coe@unipune.ac.in

## अत्यंत महत्वाचे

संदर्भ : परीक्षा/समन्वय/६७८ दिनांक : २५ मे, २०१२

प्रति,
मा.प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये,
मा.संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था,
मा.विभागप्रमुख, विद्यापीठ शैक्षणिक विभाग.

**विषय : सन २०१२ च्या प्रथमार्धातील विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षेतील उत्तरपत्रिकांचे मूल्यमापनाबाबत...**

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपल्या निदर्शनास आणून देण्यात येते की, विविध अभ्यासक्रमाचे केंद्रिय मूल्यमापन प्रकल्प आयोजित करण्यात आलेले आहेत हे आपणांस विदित आहे. तथापि, सदर संबंधित प्रकल्पांमध्ये मोठया प्रमाणात उत्तरपत्रिका मूल्यमापनाचे कामकाज प्रलंबित असून शैक्षणिक वर्ष २०१२-१३ चे शैक्षणिक सत्र वेळेत सुरु होण्याच्या दृष्टीने कालमर्यादेत उत्तरपत्रिका मूल्यमापनाचे कामकाज पूर्ण करण्यासाठी विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयास अनुसरुन आपणांस विनंती करण्यात येते की,

१. आपल्या महाविद्यालयातील/संस्थेतील/विभागातील "ज्या शिक्षकांची विद्यापीठाने परीक्षक व नियामक म्हणून नियुक्ती केलेली आहे, त्या सर्व संबंधितांनी विद्यार्थी हित लक्षात घेऊन तात्काळ उत्तरपत्रिकांच्या मूल्यमापनाचे काम सुरु करावे, असे आपणांकडून संबंधितांना कळविण्यात यावे. तद्नंतरही जे शिक्षक केंद्रिय मूल्यमापन प्रकल्पाच्या ठिकाणी उत्तरपत्रिकांच्या मूल्यमापनासाठी रुजू झाले नसतील अशा शिक्षकांची नावे तात्काळ मा.परीक्षा नियंत्रक यांच्याकडे पाठविण्यात यावीत.

२. आपल्या महाविद्यालयातील/संस्थेतील "ज्या शिक्षकांची विद्यापीठाने परीक्षक व नियामक म्हणून नियुक्ती केलेली नाही व ज्यांना किमान तीन वर्षे शिकविण्याचा अनुभव आहे, अशा सर्व शिक्षकांना ते शिकवित असलेल्या विषयांच्या उत्तरपत्रिकांच्या मूल्यमापनासाठी तात्काळ केंद्रिय मूल्यमापन प्रकल्पाच्या ठिकाणी रुजू होण्याबाबत आपल्या स्तरावर आदेश निर्गमित करावेत."

३. आपल्या महाविद्यालयातील/संस्थेतील ज्या शिक्षकांना किमान तीन वर्षे शिकविण्याचा अनुभव आहे अशा शिक्षकांना ते शिकवित असलेल्या विषयाचा अनुभवाचा दाखला केंद्रिय मूल्यमापन प्रकल्पाच्या संचालकांकडे सादर करण्यासाठी आपणाकडून देण्यात यावा.

विद्यापीठास आपण सर्व नेहमीच सहकार्य करीत आलेला आहात. अशावेळी प्राप्त परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन आपणाकडून सहकार्य मिळेल अशी अपेक्षा आहे.

कळावे,

आपली विश्वासू,

(डॉ.संपदा जोशी)
परीक्षा नियंत्रक